# महाविद्यालय विकास समिति
## वार्षिक अहवाल २०१७-१८

सार्वजनिक विद्यापीठ अधिनीयम २०१६ मधील कलम ९७ अन्वये महाविद्यालय विकास समिती महाविद्यालयात गठीत करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये महाविद्यालय विकास समितीच्या २ बैठकी पार पडल्या सदर बैठकीत झालेल्या कामकाजाचा आढाव पुढील प्रमाणे.

- महाविद्यालय विकास समितीची प्रथम सभा दि.१०/०७/२०१७ रोजी पार पडली.
  - पदवी महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीच्या दिनांक १८/०१/२०१७ रोजीच्या सभेतील कामकाजाची माहिती सभेसमोर सादर करण्यात आली व इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली.
  - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम क्रमांक ९७ (१) नुसार महाविद्यालय विकास समितीचे गठन करण्यात आलेले आहे. सदर समितीची कार्यकक्षा, कर्तव्ये, अधिकार व जबाबदारी याबाबत प्राचार्यांनी सदस्यांना सविस्तर माहिती दिली.
  - महाविद्यालय विकास समितीची ही पहिलीच बैठक असल्यामुळे महाविद्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा, शैक्षणिक अभ्यासक्रम, सहशैक्षणिक उपक्रम व मनुष्यबळ याबद्दल सविस्तर माहिती प्राचार्यांनी सभेला दिली
  - महाविद्यालयाचे आर्थिक व्यवहार , विद्यापीठ / शासन दस्तऐवज प्रक्रिया ऑनलाइन करणे या बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.
  - शैक्षणिक गुणवत्तेसाठी पायाभूत सुविधांचा विकास व उपक्रम ठरविणे यावर चर्चा करण्यात आली. आगामी पाच शैक्षणिक वर्षामध्ये गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने वाणिज्य शाखेच्या अंतर्गत कोणकोणते व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करता येतील याचा अभ्यास करून पुढील दोन महिन्यांमध्ये अहवाल सादर करण्यात यावा असे सांगण्यात आले.

- आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत शैक्षणिक गुणवत्ता मानके यांची अधिस्विकृती करणे यावर चर्चा करण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या चौथ्या दुरूस्तीनुसार महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकीर्ण – २००७/प्र.क्र.३३/१७/विशि–१, दि. ०४/०३/२०१७ प्रमाणे महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना पदोन्नतीसाठी API Category I/II/III मधील सुधारित मानके जशास तशी स्विकारण्यात येत असल्याचा ठराव करण्यात आला.

- प्राध्यापकांसाठी आचारसंहिता ठरविणे आणि विभागप्रमुखांच्या जबाबदाऱ्या निश्चित करणे यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २०१० मधील नियमावलीनुसार व मार्गदर्शक सुत्रानुसार विभागप्रमुख व सर्व प्राध्यापकांसाठी विहित केलेली आचारसंहिता, त्यांच्या जबाबदा–या व कर्तव्ये याबाबत माहिती देण्यात आली त्यावर चर्चा होवून ठराव करण्यात येतो की, ‘ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २०१० मधील नियमावलीनुसार व मार्गदर्शक सुत्रानुसार विभागप्रमुख व सर्व प्राध्यापकांसाठी विहित केलेली आचारसंहिता त्यांच्या जबाबदा–या व कर्तव्ये स्विकारण्यात येत असल्याचा ठराव करण्यात आला.

- आर्थिक वर्ष २०१७–१८ चे पदवी पदव्युत्तर विभागातील अनुदानित व विनाअनुदानित अभ्यासक्रमांचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी समितीसमोर सादर करण्यात आले. त्यावर सविस्तर चर्चा होवून अनुदानित व विनाअनुदानित विभागाच्या अंदाजपत्रकांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

- आर्थिक वर्ष २०१५–१६ मधील वेतन व वेतनेतर अनुदानाचा विनियोग तपशिल विहीत नमुन्यामध्ये सहसंचालक कार्यालयाला सादर करण्यात आला होता. त्याची प्रशासन अधिका–यांमार्फत तपासणी होवून सदर विनियोगाला मंजूरी देण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.

- आर्थिक वर्ष २०१६–१७ च्या अनुदानित व विनाअनुदानित विभागांचे तपासणीअंती सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले जमा–खर्च पत्रक व ताळेबंद सभेसमोर प्राचार्यांनी सादर केले व आर्थिक वर्ष २०१६–१७ ची सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेली जमाखर्च पत्रके व ताळेबंद यांना मंजूरी देण्यात आली.

- दिनांक १ जानेवारी २०१७ ते ३१ मे २०१७ या कालावधीत महाविद्यालयीन कर्मचा–यांनी उपभोगिलेल्या रजांचा तपशील सभेसमोर सादर करण्यात आला. सर्व रजा नियमानूसार योग्य असल्याने रजांना सर्वानूमते मंजूरी देण्यात आली.

- महाविद्यालयातील पुढील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांचा परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाला असल्याने तसेच परिविक्षाधीन काळातील त्यांचे कामकाज समाधानकारक असल्याने सेवेत कायम करण्यात आले.

| कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | प्रथम नियुक्ती दिनांक | परीविक्षाधीन काला-वधी | परीविक्षाधीन कालावधी समाप्ती दिनांक | सेवेत कायम दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| श्री.अमित श्रीपाद कुलकर्णी | कनिष्ठ लिपिक-टंकलेखक | २३/०४/२०१५ | २ वर्ष | २२/०४/२०१७ | २३/०४/२०१७ |
| श्री. सचिन सायबाना दांडेकर | ग्रंथालय परिचर | २३/०४/२०१५ | २ वर्ष | २२/०४/२०१७ | २३/०४/२०१७ |
| श्री. कैलास गोमा मेंगाळ | प्रयोगशाळा परिचर | २३/०४/२०१५ | २ वर्ष | २२/०४/२०१७ | २३/०४/२०१७ |
| श्री. महेंद्र एकनाथ मेचकर | शिपाई | २३/०४/२०१५ | २ वर्ष | २२/०४/२०१७ | २३/०४/२०१७ |

- नॅक समिती बेंगलोर यांचेकडून दि. १९,२०,२१ मार्च २०१६ रोजी महाविद्यालयाचे मुल्यांकन करण्यात आले. मुल्यांकनानुसार महाविद्यालयाला समितीकडून 'ए' (CGPA ३.०६) मानांकन मिळाले. समितीचा हा अहवाल प्राचार्यानी सभेसमोर माहितीस्तव सादर केला.
- शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चा अंतर्गत गुणवत्ता हमी समितीचा अहवाल आणि सन २०१७-१८ चे शैक्षणिक कॅलेंडर सभेसमोर सादर करण्यात आले, त्याला सभेने मंजुरी दिली.
- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी महाविद्यालयाच्या पदवी व पदव्युत्तर विनाअनुदानित विभागामध्ये कार्यभारानुसार आवश्यक असलेली शिक्षक पदे व शासन धोरणाप्रमाणे विद्यार्थी संख्येवर आधारीत आवश्यक असलेली शिक्षकेतर कर्मचारी पदे याचा तपशील प्राचार्यांनी सभेसमोर सादर केला. या विषयावर सविस्तर चर्चा होवून शैक्षणिक कामकाज सुरळीतपणे चालण्यासाठी रिक्त पदांवर पात्र व्यक्तींची नियुक्ती करण्यात यावी असे ठरविण्यात आले.
- महाविद्यालयातील पात्र प्राध्यापकांना विभाग प्रमुख म्हणून मान्यता - महाविद्यालयातील पात्र प्राध्यापकांना विभागप्रमुख म्हणून मान्यता देण्यात यावी असे ठरले.
- अतिरिक्त कार्यभारावर तासिका तत्वावर प्राध्यापकांची नियुक्ती - अतिरिक्त कार्यभार असलेल्या इंग्रजी विषयाकरिता पात्र उमेदवार मिळविण्याचा प्रयत्न करून नियुक्ती करण्यात यावी.
- एन. सी.सी. हा पर्यायी विषय म्हणून उपलब्ध करून देणे -विद्यापीठाच्या बृहद आराखड्यानुसार कार्यभारावर होणारा परिणाम विचारात घेवून प्रस्ताव तयार करण्यात यावा,असे ठरले.

- महाविद्यालय विकास समितीची द्वीतीय सभा दि.०५/०२/२०१८ रोजी पार पडली.

  - पदवी महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीच्या दिनांक १०/०७/२०१७ रोजीच्या सभेतील कामकाजाची माहिती सभेसमोर सादर करण्यात आली व इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली.
  - आर्थिक वर्ष २०१८-१९ चे अनुदानित व विनाअनुदानित विभागाच्या अंदाजपत्रकांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.
  - तृतीय वर्ष कला/वाणिज्य / विज्ञान या वर्गांच्या मार्च / एप्रिल २०१७ च्या परीक्षांचा मुंबई विद्यापीठाचा निकाल प्राचार्यांनी सभेसमोर तपशिलवार सादर केला. महाविद्यालयाचा कला शाखेचा निकाल ७०.९१ %, वाणिज्य शाखेचा निकाल ९१.०१% तर विज्ञान शाखेचा निकाल ६९.०५% जाहीर झाला आहे. उत्कृष्ठ निकालाची परंपरा सांभाळल्यामुळे सर्व यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले.
  - दिनांक १ जून २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ या कालावधीत महाविद्यालयीन कर्मचा-यांनी उपभोगिलेल्या रजांचा तपशील सभेसमोर सादर करण्यात आला. सर्व रजा नियमानूसार योग्य असल्याने रजांना मंजूरी देण्यात आली.
  - शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी महाविद्यालयाच्या विनाअनुदानित पदवी (संगणकशास्त्र), पदव्युत्तर रसायनशास्त्र/भौतिकशास्त्र विभागात कार्यभारानुसार आवश्यक असलेल्या पदांवर शिक्षकांची तसेच कार्यालयीन व्यवस्थापनाकरीता कार्यालय सहाय्यक यांची नियुक्ती करण्यात आली.
  - महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.पी.तेंडोलकर यांनी महाविद्यालयातील प्रथम सत्र कामकाजाचा आढावा सभेसमोर सादर केला. सांस्कृतिक, क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांचे यश व विविध पदके, महिला विकास कक्ष, राष्ट्रीय सेवा योजना, एक्स्टेंशन ॲक्टीव्हीटीज या सर्व कामकाजाचा सविस्तर तपशिल सादर केला. या कामकाजाबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.
  - महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी समितीकडुन प्राप्त झालेला प्रार्थमिक अहवाल सभेसमोर सादर करण्यात आला.
  - महाविद्यालयाच्या उपहारगृहासाठी एक स्वतंत्र किचन, १०० विद्यार्थी बसतील एवढी जागा व स्टाफसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था असलेले उपहार गृह आवश्यक असल्यासंबधी चर्चा होऊन संस्थेच्या नियामक मंडळाला शिफारस करण्याचे ठरविण्यात आले.
  - शिक्षक प्रतिनिधी / कर्मचारी प्रतिनिधी यांच्याकडून आलेले विषय..

    १. स.का.पाटील संशोधन सभागृहामध्ये महाविद्यालयीन कर्मचा-यांसाठी प्रसाधनगृहाची व्यवस्था करणे.

२. इंगिलश विषयाचे प्राध्यापक डॉ. एल. बी. पाटील यांचा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये घेतलेल्या इंग्रजी विषयाच्या घडयाळी तासिकांचे मानधन मिळण्याबाबतचा विनंती अर्ज सादर करण्यात आला.

➢ आयत्या वेळचे विषय

१. दि. १० जुलै २०१७ रोजी, महाविद्यालय विकास समितीच्या सभेतील विषय क्र. ०८ नुसार प्राध्यापंकासाठी आचारसंहिता आणि विभागप्रमुखांच्या जबाबदा-या निश्चित करण्यात आल्या होत्या. या स्विकारलेल्या आचारसंहितेला अनुसरून विभागप्रमुख आणि शिक्षक यांची सभा बोलावणे.

२. विद्यार्थ्यांच्या कौशल्याला चालना देण्याच्या दृष्टिने कौशल्य विकास समितीची (Skill Development Committee) स्थापन करण्याचे ठरविण्यात आले. सदर समिती ही उच्च माध्यमिक आणि पदवी महाविद्यालय या दोन स्तरावर कार्य करेल.

३. Global Talent Track Private Limited, बजाज फिनसर्व्ह आणि महाविद्यालय यांच्या सयुंक्त विद्यमाने, महाविद्यालयात Spoken English and Confidence Building हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. सदर अभ्यासक्रमासाठी बजाज फिनसर्व्ह यांच्या CSR फंडातून रक्कम रुपये २,१०,०००/- प्राप्त झाले आहेत.

४. सायन्स बिल्डिंगच्या भिंतींच्या दुरुस्तीबाबत नियामक मंडळाकडे शिफारस करणे.

५. आगामी वर्षात येणा-या नॅकच्या दृष्टीने, महाविद्यालयातील शिक्षकांचे, विद्यार्थ्यांचे ॲप तयार करण्यात यावे तसेच महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्याचा संघ स्थापन करून त्याची नोंदणी करावी आणि पालक शिक्षक संघ स्थापन करण्यात यावा.

६. हॉल क्र.१२ - इंग्लिश लॅग्वेज लॅबच्या सुशोभिकरणासाठी रक्क्म रु. २,००,०००/- मालतीबाई हळबे ट्रस्टकडून मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

NYA. ATHALYE, VED. SAPRE, VID. PITRE COLLEGE ● DEVRUKH

प्राचार्य